लायन्स क्लबचे शालेय साहित्य वितरण

धामणगाव रेल्वे : लायन्स क्लब धामणगाव रेल्वेच्या वतीने स्व. नरेंद्र भोगे यांच्या स्मृत्यर्थ शालेय साहित्य वितरण अतुल भोगे यांच्यातर्फे करण्यात आले. शहरातील स्व. नंदलाल लोया कन्या विद्यालय व श्रीराम कनिष्ठ महिला महाविद्यालय येथे आयोजित कार्यक्रमाला प्रमुख अतिथी म्हणून नगराध्यक्षा डॉ. अर्चना अडसड रोठे, नगर परिषदेचे उपाध्यक्ष, संचालक गिरीश उर्फ बंडू मुंदडा, लॉयन्स अध्यक्ष विशाल पनपालिया व प्रकल्प अधिकारी प्राचार्य अर्चना राऊत मंचावर उपस्थित होते. यावेळी मनोज मुंदडा, प्रफुल्ल पोळ, विजय रोंघे, योगेश मुंदडा, मेहेर निस्ताने, रमेशचंद्र चांडक, प्रेमचंद मुंदडा, रामराव अतकरे, रामेश्वर चांडक, अशोक भंडारी, रमेश ठाकरे, सुरेश लोया, प्रवीण तलवारे, प्रसन्ना भंडारी, राजकुमार पुरोहित उपस्थित होते. ■

आपलं अमरावती

तरुण भारत

www.tarunbharat.net

नागपूर, सोमवार, २८ सप्टेंबर २०२६ २

मंजुषा साबळेंच्या गायनाने रसिक मंत्रमुग्ध

शिरखेड : संत नामागुरू महाराज संस्थानच्या वतीने नामागुरू महाराज सांस्कृतिक भवन येथे सुमधुर मराठी व हिंदी भक्तिगीतांचा 'स्वरांजली' कार्यक्रम पार पडला. गायिका मंजुषा संजय साबळे यांच्या गायनाने उपस्थित रसिकांना मंत्रमुग्ध केले. विविध भावछटा समर्थपणे उलगडणारा त्यांचा आवाज, शब्दांमधील भावार्थाशी एकरूप होणारी गायकी आणि भक्तिरसाची अनुभूती देणारे सादरीकरण हे कार्यक्रमाचे प्रमुख आकर्षण ठरले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी संस्थानचे अध्यक्ष सुधाकर गोमकाळे हे होते. प्रमुख उपस्थितीमध्ये दीपक फुटाणे, विठ्ठल देशमुख, ॲड., पर्यावरणमित्र मनोज देशमुख, रविशंकर शिंदे, नंदकिशोर मुंदडा तसेच अनिल शिंदे यांचा समावेश होता. ■

राजेशाही

हाडपक

हाडपक लागल्यापासून
बजारात झाली गर्दी कमी..
सेल लागले मोठमोठे
पन मालाची नाई हमी.. !
हाडपकात म्हनते काई
खरेदी करत नसते...
हा त ज्याच्या त्याच्या
मानसिकतेचा फरक असते.. !
दुकानदारखबी दुकानातला
बराच माल टाकते इकून...
किती सेल लावा तरी
दुकानदारच जाते जिकून.. !
नवा माल भरासाठी
रायते तरतूद सारी...
सामान्य जनता या लोभाले
बळी पडते बिचारी.. !
खरं म्हनजे पितरायचे हे दिवस
घरोघरी पित्तर जेवाले येते..
मोहाच्या पात्तरवाळीत
मग सुनबाई जेवाले देते.. !
पण हे असं करा तसं करा
बिझी सारेच्या सारे नेटकरी...
रायते उपाय धुंडाळण्यात बिझी
तिकडे पित्तर जेवाले वेटकरी.. !
हाडपकातले नियम सारे
म्हतारे सांगतात आपल्याले..
कारण मांगचं समजून घेता
गुढ समजते सारयले... !

वृषाली विजय देवकर
परतवाडा ९८६०८२३६७७

'खरेदी-विक्री'च्या आमसभेत खडाजंगी

बैठक भत्ता व लाभांश वाटपावर चर्चा

धारणी, २७ सप्टेंबर

धारणी तालुका खरेदी-विक्री सोसायटीची वार्षिक सर्वसाधारण सभा शनिवार, २७ सप्टेंबर रोजी धारणी येथील समाज भवनमध्ये उत्साहात पार पडली. सोसायटीचे अध्यक्ष श्रीपाल यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या या सभेला संचालक मंडळातील सदस्य तसेच सोसायटीचे सभासद मोठ्या संख्येने उपस्थित होते. सभेत काही मुद्द्यांवर सदस्यांमध्ये खडाजंगी झाली.

आमसभेत उपस्थित सोसायटीचे पदाधिकारी

सभेच्या प्रारंभी मागील वर्षातील कामकाजाचा आढावा घेण्यात आला. त्यानंतर सोसायटीच्या वार्षिक खर्चाचा तपशील, नफा-तोटा, बैठक भत्ता, एकूण लाभांश वाटप तसेच आगामी काळातील आर्थिक व प्रशासकीय नियोजनासंदर्भात विविध विषयांवर चर्चा करण्यात आली. सभेत मांडण्यात आलेल्या काही विषयांवर सभासदांकडून समर्थन व्यक्त करण्यात आले, तर काही मुद्द्यांवर विरोधी मतेही समोर आली. त्यामुळे काही काळ सभागृहातील वातावरण चांगलेच तापले. चर्चेदरम्यान काही सभासद व पदाधिकाऱ्यांमध्ये शाब्दिक चकमक झाल्याचे दिसून आले. मात्र, चर्चेनंतर संबंधित विषयांवर मार्ग काढण्याचा प्रयत्न करण्यात आला.

सोसायटीच्या कामकाजात पारदर्शकता, सभासदांच्या हिताचे निर्णय आणि आर्थिक व्यवहारांची योग्य अंमलबजावणी याबाबतही सभासदांनी आपली मते मांडली. सभासदांच्या प्रश्नांना आणि सूचनांना पदाधिकाऱ्यांनी उत्तर देत आगामी काळात सोसायटीच्या माध्यमातून अधिक प्रभावीपणे काम करण्याचे आश्वासन दिले.

विशेष बाब म्हणजे, आगामी वार्षिक सर्वसाधारण सभेमध्ये सभासदांसाठी अल्पोपहाराऐवजी जेवणाची व्यवस्था करण्यात यावी, याबाबत सभेत ठराव घेण्यात आला. या निर्णयाचे उपस्थित सभासदांनी स्वागत केले. एकंदरीत विविध आर्थिक व प्रशासकीय विषयांवरील चर्चा, समर्थन-विरोध आणि काही काळ झालेल्या शाब्दिक वादामुळे धारणी तालुका खरेदी-विक्री सोसायटीची वार्षिक सर्वसाधारण सभा चर्चेचा विषय ठरली. ◂ (तभा वृत्तसेवा)

आज माहिती अधिकार दिन साजरा करा

अमरावती : नागरिकांमध्ये माहितीच्या अधिकाराबाबत जनजागृती व्हावी, यासाठी सोमवार, २८ सप्टेंबर रोजी 'माहिती अधिकार दिन' साजरा करण्याचे आवाहन राज्य माहिती आयोग, अमरावती खंडपीठाने दिले आहेत. माहिती अधिकार दिनानिमित्त माहिती अधिकार कायद्याच्या कलम २६च्या अनुषंगाने नागरिक आणि विद्यार्थ्यांमध्ये या कायद्याबाबत साक्षरता निर्माण करण्यासाठी विशेष कार्यक्रमांचे आयोजन करण्याचे निर्देश देण्यात आले आहेत. त्यामुळे शासकीय कार्यालयांसोबतच शाळा आणि महाविद्यालयांमध्येही माहिती अधिकार जनजागृती कार्यक्रम आयोजित करण्यात यावे, कायद्याच्या कलम ४ नुसार प्रत्येक कार्यालयात जन माहिती अधिकारी आणि प्रथम अपील अधिकारी यांचे नाव व पदनाम दर्शवणारे फलक लावणे आणि ते वेळेवर अद्यावत ठेवणे बंधनकारक केले आहे. ■

महसूल सेवकांचे आजपासून मुंबईत आंदोलन

तिवसा शाखेचे सेवक सहभागी

तिवसा, २७ सप्टेंबर

तालुक्यातील महसूल सेवक आपल्या विविध प्रलंबित न्याय्य मागण्यांसाठी सोमवार, २८ सप्टेंबरपासून आझाद मैदान, मुंबई येथे होणाऱ्या राज्यस्तरीय आंदोलनात सहभागी होणार आहेत. याबाबत महाराष्ट्र राज्य महसूल सेवक संघ, शाखा तिवसाच्या वतीने शुक्रवारी तिवसा तहसीलदार यांना निवेदन देण्यात आले.

महसूल विभागाच्या कामकाजात महत्त्वाची भूमिका बजावणाऱ्या महसूल सेवकांच्या विविध मागण्या शासनस्तरावर प्रलंबित आहेत. या मागण्यांकडे शासनाचे लक्ष वेधण्यासाठी आणि न्याय्य हक्क मिळवून घेण्यासाठी राज्यभरातील महसूल सेवकांनी आंदोलनाची भूमिका घेतली आहे. तिवसा तालुक्यातील सर्व महसूल सेवकही या आंदोलनात सहभागी होणार असल्याचे संघटनेने निवेदनातून म्हटले आहे. यामध्ये शिपाई संवर्गातील ४० टक्के पदोन्नती कोटा पूर्ववत करण्याची मागणी,

महसूल सेवकांच्या प्रमुख मागण्यांमध्ये शिपाई संवर्गाकरिता असलेला ४० टक्के पदोन्नती कोटा पूर्ववत सुरू करण्यात यावा, अशी मागणी करण्यात आली आहे. तसेच महसूल मंत्र्यांनी घोषित केलेले ग्राम महसूल अधिकारी पदाकरिता २० टक्के आरक्षण जुलै २०२६ च्या एमपीएससी जाहिरातीत समाविष्ट करण्यात यावे, अशीही मागणी आहे. कोरोना काळात मृत्यू झालेल्या कोतवालांच्या कुटुंबीयांचा शासनाने विचार करावा, अशी मागणी करण्यात आली आहे. अनुकंपा नियुक्तीबाबतचा शासन निर्णय कोरोना काळापासून लागू करून, मृत महसूल सेवकाच्या जागी त्यांच्या पात्र वारसाला सरळ नियुक्ती देण्यात यावी, अशी मागणी संघटनेने केली आहे. महसूल सेवक म्हणजेच कोतवाल हे पद स्वातंत्र्यपूर्व काळापासून महसूल विभागात सुरू आहे. सन १९९७ पासून सेवा देणारे अनेक कर्मचारी आजही प्रदीर्घ सेवा बजावत आहेत. मात्र, पदोन्नतीच्या संधी, वयोमर्यादा तसेच अन्य विभागीय परीक्षांच्या अटींमुळे या कर्मचाऱ्यांसमोर भविष्यातील सेवाविषयक प्रश्न निर्माण झाले आहेत. अल्पशिक्षित तसेच सेवाज्येष्ठ महसूल सेवकांच्या भविष्याचा शासनाने सहानुभूतीपूर्वक विचार करून योग्य सेवाविषयक तरतूद करावी, अशी मागणी संघटनेने केली आहे. अनेक वर्षे सेवा करूनही भविष्यातील संधींचे मार्ग बंद होत असल्याने महसूल सेवकांमध्ये मोठ्या प्रमाणावर असंतोष निर्माण झाल्याचे संघटनेने निवेदनात नमूद केले आहे. यावेळी बाळूभाऊ पुरडे, मीनाक्षी महल्ले, अजय खाकसे, शुभम जोरे, काशिफ शेख उपस्थित होते. ◂ (तभा वृत्तसेवा)

डॉ. हेडगेवार हॉस्पिटलमध्ये हाडांची ठिसुळता तपासणी

अमरावती, २७ सप्टेंबर

वाढत्या वयात हाडे पातळ, ठिसूळ होऊन हाडांची झीज आणि घर्षण आयुष्यभर चालू राहते. यामुळे पुढे ऑस्टियोपोरोसिसची स्थिती निर्माण होऊ शकते. या निदानासाठी हाडांची घनता व ठिसूळपणा तपासणी आवश्यक असून त्या हेतूने डॉ. हेडगेवार हॉस्पिटलमध्ये आयोजित बीएमडी निःशुल्क तपासणी शिबिर आयोजित करण्यात आले.

या शिबिरात १९५ रुग्णांची बीएमडी तपासणी करण्यात आली. गणेशोत्सवात आयोजित या शिबिरात रुग्ण तपासणी अस्थिरोग तज्ञ व सर्जन डॉ. अभिलाष पोहोकार आणि डॉ. मंगेश नवले यांनी केली. त्यांना डॉ. अवंतिका कोटेवार आणि डॉ. वर्षा केसवानी यांनी सहकार्य केले. शिबिराच्या निमित्ताने दिवसभर रुग्णांनी हॉस्पिटल गजबजले होते. सन फार्मा कंपनीचे संदीप कुमार आणि गोपाल भागवतकर तसेच हॉस्पिटलच्या आरती करवले, सोनाली पेंढारकर, ज्ञानेश्वरी जुमळे, प्रतिक भस्मे, राहूल लोंढे, धनश्री चव्हाण यांच्यासह कर्मचारी वर्गाने शिबिरासाठी परिश्रम घेतले. ◂ (तभा वृत्तसेवा)

चार सराईत गुन्हेगार जिल्ह्यातून हद्दपार

ग्रामीण पोलिसांची मोठी कारवाई

अमरावती, २७ सप्टेंबर

आगामी सण-उत्सवांच्या काळात कायदा व सुव्यवस्था अबाधित राखण्यासाठी अमरावती ग्रामीणचे पोलिस अधीक्षक निकेतन कदम यांनी गुन्हेगारी प्रवृत्तीच्या इसमांवर कठोर प्रतिबंधात्मक कारवाईचा बडगा उगारला आहे. परिसरात दहशत पसरवणाऱ्या चार सराईत गुन्हेगारांच्या दोन टोळ्यांना अमरावती जिल्ह्यातून हद्दपार करण्याचे आदेश त्यांनी निर्गमित केले आहेत.

हद्दपार करण्यात आलेल्या आरोपींमध्ये परतवाडा पोलिस स्टेशन हद्दीतील संतोष पेंदे व निखिल मंडले (दोघे रा. पेन्शनपुरा, परतवाडा) तसेच शिरखेड पोलिस स्टेशन हद्दीतील कुलदीप अंभोरे व अक्षय मोहोकार (दोघे रा. राजुरवाडी, ता. मोर्शी) यांचा समावेश आहे. परतवाडा परिसरात बेकायदेशीर शस्त्रे बाळगून गुन्हे करणाऱ्या संतोष पेंदे व निखिल मंडले यांच्या टोळीविरुद्ध परतवाडा पोलिसांनी तडीपारीचा प्रस्ताव सादर केला होता. शिरखेड भागात चोरी आणि अन्य गुन्हे करून दहशत निर्माण करणाऱ्या कुलदीप अंभोरे व अक्षय मोहोकार यांच्याविरुद्ध शिरखेड पोलिसांनी असाच प्रस्ताव दाखल केला होता. या प्रस्तावांवर अचलपूर व मोर्शीच्या उपविभागीय पोलिस अधिकाऱ्यांमार्फत चौकशी करून अहवाल मागवण्यात आला. चौकशीत आरोपींमुळे सार्वजनिक शांतता व मालमत्तेस धोका असल्याचे सिद्ध झाल्याने पोलिस अधीक्षक निकेतन कदम यांनी २२ सप्टेंबरला तडीपारीचे आदेश दिले. यानुसार संतोष पेंदे व निखिल मंडले यांना ६ महिन्यांसाठी तर कुलदीप अंभोरे व अक्षय मोहोकार यांना ३ महिन्यांसाठी अमरावती जिल्ह्याच्या हद्दीतून तडीपार करण्यात आले आहे. या आदेशाची तत्काळ अंमलबजावणी करण्यात आली असून, जिल्ह्यात गुन्हेगारीवर नियंत्रण मिळवण्यासाठी यापुढेही अशीच कठोर कारवाई सुरू राहील, असा इशारा प्रशासनाने दिला आहे. ◂ (तभा वृत्तसेवा)

कबड्डी संघ जिल्हास्तरावर

कुऱ्हा : कुऱ्हा हायस्कूल व कनिष्ठ महाविद्यालय येथील १९ वर्षे आतील मुलांचा संघ तालुकास्तरीय स्पर्धेकरिता पात्र ठरला आहे. या संघामध्ये अमित हाखोरे, उजेब खान, उदय पवार, तुषार जाधव, आर्यन

पुण्यतिथी महोत्सवापर्यंत अतिक्रमण कारवाई नाही

सुरेशराव भोंगाडे

कुऱ्हा : बोर्डा येथील श्री. गुरुदेव विद्या मंदीराचे सेवानिवृत्त

कर्मचारी तथा श्री गुरुदेव सेवा भजनी मंडळाचे सदस्य सुरेशराव नथ्थुजी भोंगाडे यांचे दीर्घ आजाराने निधन झाले. ते ६५ वर्षांचे होते. त्यांच्या पश्चात पत्नी, दोन मुले, एक मुलगी, स्नुषा, जावाई व बराच मोठा आप्त परिवार आहे. ■

यज्ञास शनिवार २६ सप्टेंबरपासून सुरवात झाली असून ४ ऑक्टोबरपर्यंत होतो आहे. १३ अक्षरी रामनाम जप यज्ञाचे हे अकरावे वर्ष आहे.

दोन टप्प्यात हा जपयज्ञ आयोजकांनी विभागला आहे. पहिल्या टप्प्यात २६ सप्टेंबर ते १ ऑक्टोबर या काळात भाविकांनी घरून जप करावा तर दुसरा टप्पा २ ते ४ ऑक्टोबर या कालावधीत जप परिणय बंध सभागृहात होणार असून भाविक आपापल्या सोयीनुसार घरून येऊन तेथे जप करू शकतात आणि सहभागी होऊ शकतात.



जपाचे, नामाचे महत्त्व सांगितले आहे. गुरू आज्ञेचे पालन करा व १३ कोटी रामनाम जपात अधिकाधिक भाविकांनी सहभागी व्हावे. अधिकाधिक रामनाम जप करा आणि १३ कोटीचा संकल्प पूर्ण करण्यास सहकार्य करावे. अधिक माहितीसाठी ९४२३१२४४४० / ९४०५३१९३०३ किंवा ९२२६१२५५३३ या क्रमांकावर संपर्क साधावा. तसेच तन, मन, धनाने सहकार्य करावे, अशी विनंती सच्चिदानंद सद्गुरु श्रीराम महाराज सेवा मंडळाने केली आहे. ◂ (तभा वृत्तसेवा)

आ. राजेश वानखडे यांचे आश्वासन

तिवसा, २७ सप्टेंबर

राष्ट्रसंत तुकडोजी महाराजांच्या गुरुकुंज आश्रमासमोरील व लगतच्या राष्ट्रीय महामार्गालगत व्यवसाय करणाऱ्या स्थानिक दुकानदार व व्यावसायिकांची स्थायी तसेच अस्थायी अतिक्रमणे राष्ट्रसंत तुकडोजी महाराजांच्या पुण्यतिथी महोत्सवाची यात्रा होईपर्यंत काढण्यात येणार नाहीत, असे आश्वासन आमदार राजेश वानखडे यांनी स्थानिक व्यावसायिकांना दिले.

स्थानिक व्यावसायिकांची बैठक घेताना आमदार राजेश वानखडे

गुरुकुंज मोझरी येथे राष्ट्रसंत तुकडोजी महाराजांच्या पुण्यतिथी महोत्सवानिमित्त दरवर्षी मोठ्या संख्येने भाविक दाखल होतात. या पृष्ठभूमीवर राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरणाच्या माध्यमातून या मार्गाच्या सुधारणा व विकासकामासाठी निविदा प्रक्रिया सुरू करण्यात आली आहे. या कामाच्या अनुषंगाने राष्ट्रीय महामार्गालगत व्यवसाय करणाऱ्या

व्रजावण्यात आल्या होत्या. त्यामुळे स्थानिक व्यावसायिकांमध्ये चिंता निर्माण झाली होती. याबाबत व्यावसायिकांनी आमदार राजेश वानखडे यांची भेट घेऊन पुण्यतिथी महोत्सवाची यात्रा होईपर्यंत अतिक्रमणाची कारवाई करू नये, अशी मागणी केली. या मागणीची तत्काळ दखल घेत आमदार राजेश वानखडे यांनी गुरुकुंज मोझरी येथे प्रत्यक्ष भेट देऊन स्थानिक दुकानदार व व्यावसायिकांशी चर्चा केली. तसेच राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरणाच्या संबंधित अधिकाऱ्यांशीही प्रत्यक्ष चर्चा करून पुण्यतिथी महोत्सवाची यात्रा होईपर्यंत

दरम्यान, राष्ट्रीय महामार्गाचे प्रस्तावित सुधारणा काम देखील आवश्यक असल्याचे आमदार वानखडे यांनी स्पष्ट केले. आश्रमासमोरील भुयारी मार्ग सध्याच्या रस्त्याच्या पातळीपेक्षा सुमारे तीन फूट खाली असल्याने भविष्यात या ठिकाणी आवश्यक सुधारणा व सुरक्षिततेच्या दृष्टीने काम करणे गरजेचे असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. स्थानिक व्यावसायिकांनी आमदार राजेश वानखडे यांनी आपल्या मागणीची तत्काळ दखल घेत पुढाकार घेतल्याबद्दल त्यांचे आभार मानले. ◂ (तभा वृत्तसेवा)

Saraswati Bahuudeshiya Shikhsan, Sanstha

Badnera Road, Amravati

Reg. No MH/639/08F/16066/AMT

Contact No. 8007851484/9823275329

SARASWATI INSTITUTE OF NURSING SCIENCES & RESEARCH, AMRAVATI

(Recognized to Govt. MNC & MUHS Nashik)

ADMISSION NOTICE

M.SC NURSING (2 YEAR COURSE) - ACADAMIC YEAR 2026-2027

SPECIALITY WISE SEAT DISTRIBUTION –

Specialty	Constitutional Reservation Category												
	SC	ST	VJ	NT-1	NT-2	NT-3	OBC	SBC	SEBC	EWS	OPEN	15% Inst	Total
Medical Surgical Nursing (CVTS)	1	0	0	0	0	0	1	0	1	1	4	2	10
Mental Health Nursing	0	1	0	0	1	0	0	1	1	1	4	1	10
Total	1	1	0	0	1	0	1	1	2	2	8	3	20

SR. NO	SCHEDULE-1	DATE
1	Last date of submission of application form & specialty-wise preference form	02/10/2026
2	Publication of Provisional Selection List/ Merit List/ Waiting List/Rejected List(Specialty-wise)	05/10/2026
3	Last date of joining	09/10/2026

IMPORTANT INSTRUCTION & GUIDELINES

1. **Contact nos.** +91 80078 51484/+91 98232 75329
2. **Selection of candidates** will be purely on a merit basis and will strictly adhere to the reservation norms of the **Government of Maharashtra, MUHS Nashik, and MNC.**
3. Please visit our website for the **Application Form, Specialty-wise Preference Form, Merit List, Waiting List, Rejected** List, **Selection List,** and other important information.
4. **Incomplete applications** or forms received after the due date will not be accepted.
5. **All candidates must bring their original documents** on the date of admission.
6. Application Will Be Accepted Even on Holiday, in person along with essential documents.

* **Note :** Please keep checking the website regularly for the latest updates: www.sinsramt.org

HOD, ADMISSION CELL　　　　PRINCIPAL

उद्याचा 'रोजगार महाकुंभ' तूर्तास स्थगित

अमरावती, २७ सप्टेंबर

महाराष्ट्र विधानपरिषदेच्या अमरावती विभाग शिक्षक मतदारसंघाची द्विवार्षिक निवडणूक जाहीर झाली आहे. यामुळे संपूर्ण अमरावती विभागात आदर्श आचारसंहिता लागू करण्यात आली आहे. या पृष्ठभूमीवर, कौशल्य विकास विभागामार्फत जिल्ह्यात मंगळवार २९ सप्टेंबर रोजी आयोजित करण्यात आलेले 'रोजगार महाकुंभ २०२६' व त्याअंतर्गत होणारे सर्व रोजगार मेळावे तात्पुरते स्थगित करण्यात आले आहेत. आचारसंहितेच्या नियमांमुळे हा कार्यक्रम तूर्तास पुढे ढकलण्यात आला आहे. येत्या काळात रोजगार मेळाव्याची नवीन तारीख योग्यवेळी स्वतंत्रपणे जाहीर करण्यात येणार आहे. जिल्ह्यातील सर्व नोकरी इच्छुक उमेदवार, शैक्षणिक संस्थांनी या बदलाची नोंद घ्यावी, असे प्रांजली बारस्कर यांनी कळविले. ◂ (तभा वृत्तसेवा)

क्लिनिक प्लसची नवी चित्रफित प्रदर्शित

अमरावती : क्लिनिक प्लसच्या नव्या चित्रफितीचा शुभारंभ 'डॉटर्स डे'च्या निमित्ताने झाला. क्लिनिक प्लस आई आणि मुलीच्या त्या नात्याला सलाम करत आहे, ज्यात दोघी नकळत एकमेकींचं बळ बनतात. भारतीय घरांमध्ये आया आपल्या मुलींना स्वतःसाठी उभं राहायला आणि स्वतःचा आवाज शोधायला शिकवत आल्या आहेत; मात्र त्यांच्याकडूनच गप्प राहण्याची, जुळवून घेण्याची आणि स्वतःच्या वाट्याच्या तडजोडी मुकाट सोसण्याची अपेक्षा केली जाते. तरीही जे जगाच्या नजरेतून सुटतं, ते मुलगी नेमकं टिपते. आईचे न बोललेले त्याग ती सहज वाचते आणि कठीण प्रसंगातला तिचा संयम आत्मसात करते. ही चित्रफीत आजच्या मुलीला केवळ वाढवायची लेक म्हणून नव्हे, तर आईचा सर्वात मोठा आधार म्हणून समोर आणते. चित्रफितीची मांडणी एका पुस्तक प्रकाशन सोहळ्याभोवती आहे, जिथे एक लेखिका स्वतःच्या आयुष्यातून उतरलेल्या कवितांचा संग्रह सादर करते. तुमच्या लेखनामागची प्रेरणा कोण, असं विचारलं असता ती फक्त आपल्या मुलीकडे बोट दाखवते. इथून कथा बालपणीच्या एका क्षणाकडे वळते, जिथे ती चिमुरडी दोन वेण्यांऐवजी एकच वेणी घालण्याचा हट्ट धरते आणि खरी ताकद आतूनच येते, हे मूळ रूपक इथेच रुजतं. ◂ (वा. वा.)

आठ वर्षांनंतर थांबली टाकरखेड्यात मुक्कामी बस

माजी उपसरपंचांच्या पाठपुराव्याला यश

टाकरखेडा संभू, २७ सप्टेंबर

गेल्या सात ते आठ वर्षांपासून टाकरखेडा संभू गावाच्या नावाने रात्रीची बसफेरी बंद असल्याने विद्यार्थी, नोकरदार, महिला व नागरिकांना मोठ्या अडचणींचा सामना करावा लागत होता. अखेर उपसरपंच प्रदीप शेंडे याच्या सातत्यपूर्ण पाठपुराव्याला यश आले असून, तब्बल आठ वर्षांनंतर टाकरखेडा संभू येथे रात्री मुक्कामी बसफेरी सुरू झाली आहे.

चालक-वाहकांचा सत्कार करताना प्रदीप शेंडे

ही बस अमरावती येथून रात्री ८ वाजता सुटून टाकरखेडा संभू येथे मुक्कामी राहणार असून, दुसऱ्या दिवशी सकाळी ६ वाजता टाकरखेडा संभू येथून अमरावतीकडे परतीचा प्रवास करणार आहे. रविवार, २० सप्टेंबरच्या रात्री या बसने पहिली फेरी केली. सोमवारी सकाळी बसफेरीचे औपचारिक स्वागत करून चालक ए. एम. मोहोड व वाहक एस. आर. भिहाडे यांचा सत्कार करण्यात आला. यावेळी गावातील नागरिक, विद्यार्थी व प्रवासी मोठ्या संख्येने उपस्थित होते. गावासाठी रात्रीची बस सुरू व्हावी यासाठी माजी उपसरपंच प्रदीप शेंडे यांनी गेल्या अनेक वर्षांपासून सातत्याने पाठपुरावा केला. यासाठी विद्यार्थ्यांचा मोर्चा, विभागीय नियंत्रकांना निवेदने तसेच अमरावती आणि नागपूर येथे प्रत्यक्ष भेटी घेऊन निवेदने देण्यात आली. पालकमंत्र्यांकडेही याबाबत मागणी करण्यात आली होती. याची दखल घेत अखेर विभाग नियंत्रक सचिन क्षीरसागर यांनी तातडीने बस सुरू करण्याचे आदेश दिले व बसफेरी सुरू करण्यात आली. रात्रीच्या वेळेत अमरावतीहून गावाकडे परतणाऱ्या नागरिकांसह विद्यार्थ्यांना या बसफेरीचा मोठा फायदा होणार आहे. गावाच्या नावाने रात्रीची बस नसल्याने अनेक वर्षांपासून नागरिकांना खासगी वाहनांवर किंवा इतर मार्गांवर अवलंबून राहावे लागत होते. आता नियमित बसफेरी सुरू झाल्याने नागरिकांची ही गैरसोय दूर होण्यास मदत होणार आहे. बसफेरी सुरू झाल्याबद्दल नागरिकांनी एसटी महामंडळ, पालकमंत्री तसेच संबंधित अधिकारी आणि माजी उपसरपंच प्रदीप शेंडे यांचे आभार मानले. ◂ (तभा वृत्तसेवा)

शे.बाजार येथील मारोती देवस्थानच्या जमिन लाटण्याचा प्रयत्न फसला

मंदिर महासंघाच्या पाठपुराव्याला यश

आमा प्रतिनिधी/२७ सप्टेंबर

चांदूर रेल्वे : तालुक्यातील शेंदुर्जाना बाजार येथील इतिहासीक असलेल्या श्री मारोती देवस्थानच्या मालकीच्या कोट्यवधी रुपयांचे मूल्य असलेली शेतजमीन लाटण्याचा प्रयत्न प्रशासनाने हाणून पाडला आहे. महाराष्ट्र मंदिर महासंघाच्या सजगतेमुळे आणि पाठपुराव्यामुळे चांदूर रेल्वेच्या तहसीलदारानी कुळ खरेदी हक्काचा अर्ज फेटाळून लावला असून देवस्थानच्या हक्कावर कायदेशीर शिक्कामोर्तब केले आहे.

गेल्या काही वर्षापासून देवस्थानाच्या जमिनीचा वाद आहे चांदूर रेल्वे तहसीलदार यांच्याकडे सुरु होता अखेर तहसीलदार यांनी यामध्ये महत्त्वपूर्ण निर्णय दिल्याने त्यांच्या या निर्णयाचे स्वागत देवस्थान समितीकडून करण्यात आले आहे.

श्री मारोती देवस्थान (शेंदुरजना बाजार) यांच्या मालकीची चांदूर रेल्वे (भाग-१) येथील गट क्र. ६३ ही ०.७९ हेक्टर शेतजमीन आहे. ही जमीन नगरपरिषद हद्दीत येत असल्याने तिचे बाजारमूल्य अत्यंत जास्त आहे. या जमिनीतून मोठा आर्थिक फायदा करून घेण्याच्या हेतूने दामोदर रामभाऊ नागमोते यांनी कुळ कायद्यानुसार खरेदीचा अधिकार मिळवण्यासाठी चांदूर रेल्वेचे तहसीलदार तथा शेतजमीन न्यायाधिकरण यांच्याकडे अर्ज दाखल केला होता व त्या अनुषंगाने जमिनीची खरेदी प्रक्रिया सुरू करण्यात आली होती.

ही गंभीर बाब निदर्शनास येताच महाराष्ट्र मंदिर महासंघाचे राज्य पदाधिकारी अनुप जयस्वाल आणि विनीत पाखोडे यांनी तातडीने पुढाकार घेतला. त्यांनी अतिरिक्त गैरअर्जदार म्हणून न्यायालयात भक्कम हरकत नोंदवली. सदर देवस्थान हे नोंदणीकृत धार्मिक संस्थान असून, उपविभागीय अधिकारी यांच्या १४ जून १९६० च्या आदेशानुसार या जमिनीला कुळ कायद्याच्या कलम १२९ (ब) अंतर्गत 'सूट प्रमाणपत्र प्राप्त असल्याचे त्यांनी पुराव्यासह प्रशासनाच्या निदर्शनास आणून दिले. तसेच, ही जमीन विक्री प्रक्रिया तत्काळ रद्द करण्याची मागणी केली.

या प्रकरणात दोन्ही बाजूंचा युक्तिवाद आणि कागदपत्रांची सखोल पडताळणी केल्यानंतर, तहसीलदार पुजा एस. माटोडे यांनी २७ ऑगस्ट २०२६ रोजी महत्त्वपूर्ण निकाल दिला. देवस्थानच्या जमिनीला कुळ हक्क लागू होत नसल्याचे आणि अर्जदार हा मूळ कुळाचा वारस असल्याचे सिद्ध न झाल्याने त्यांनी अर्जदाराचा खरेदी हक्काचा अर्ज नामंजूर केला. या ऐतिहासिक निकालामुळे देवस्थानची कोट्यवधींची मालमत्ता सुरक्षित राहिली आहे.

या निर्णायक यशामध्ये महाराष्ट्र मंदिर महासंघाचे राज्य पदाधिकारी श्री. अनुप जयस्वाल व श्री. विनीत पाखोडे यांच्यासह देवस्थानचे विश्वस्त श्री. सतीश सावरकर, श्री. प्रफुल्ल उमप, श्री राजेन्द्र सावरकर, वामनराव भोजने, भास्करराव बोडखे, जगदिश काळे, प्रविण भोजने, सतिश सावरकर, ऑंकार देवळे, श्रीराम लोखंडे, सुधाकरराव सोनटक्के, रामकृष्ण ओलीवकर, प्रफुल्ल उमप, प्रमोद निमकर मोलाचे योगदान लाभले. या यशस्वी कार्यवाहीमुळे संपूर्ण परिसरात आणि भाविकांमध्ये आनंदाचे वातावरण असून, देवस्थान व हिंदूंच्या हक्कांसाठी झटणाऱ्या 'महाराष्ट्र मंदिर महासंघ' आणि 'हिंदू जनजागृती समिती'च्या कार्याचे सर्वत्र कौतुक होत आहे.

चांदूर रेल्वेत पर्यावरणपूरक गणेश विसर्जनातून 'हरित' संदेश

नगराध्यक्षा प्रा. प्रियंका विश्वकर्मा यांच्या हस्ते बाप्पाचे विसर्जन

कृत्रिम तलावात नागरिकांचा उत्स्फूर्त सहभाग, प्रमाणपत्रासह वृक्षवाटप

आमा प्रतिनिधी/२७ सप्टेंबर

चांदूर रेल्वे : गणेशोत्सवाला भक्तीची जोड देतानाच पर्यावरण संवर्धनाचा संदेश देण्यासाठी चांदूर रेल्वे नगरपरिषदेच्या परिसरात पर्यावरणपूरक गणेश विसर्जनाचा उपक्रम राबविण्यात आला. नगराध्यक्षा प्रा. प्रियंका विश्वकर्मा यांच्या हस्ते पर्यावरणपूरक गणेशमूर्तींचे विसर्जन करण्यात आले. यावेळी शहरातील तसेच परिसरातील अनेक नागरिकांनी कृत्रिम तलावात आपल्या लाडक्या बाप्पाचे भक्तिभावाने विसर्जन करून पर्यावरणपूरक गणेशोत्सवाला पाठबळ दिले.

पर्यावरणाचे रक्षण व्हावे, जलस्रोतांचे प्रदूषण टाळता यावे आणि गणेशोत्सवातून पर्यावरण संवर्धनाचा संदेश समाजापर्यंत पोहोचावा, या उद्देशाने कृत्रिम तलावाची व्यवस्था करण्यात आली होती. या उपक्रमाला नागरिकांनी उत्स्फूर्त प्रतिसाद देत पारंपरिक पद्धतीसोबत पर्यावरणपूरक विसर्जनाला पसंती दिली.

विशेष म्हणजे, विसर्जनासाठी आलेल्या प्रत्येक नागरिकाला नगराध्यक्षा प्रा. प्रियंका विश्वकर्मा यांच्या हस्ते प्रमाणपत्र आणि वृक्षाचे वाटप करण्यात आले. 'बाप्पाला निरोप देताना पर्यावरणाचीही काळजी घेऊया' असा संदेश या उपक्रमातून देण्यात आला. त्यामुळे गणेश विसर्जनाचा हा सोहळा केवळ धार्मिक न राहता सामाजिक आणि पर्यावरणीय जाणीव जागविणारा ठरला. यावेळी डॉ. निलेश विश्वकर्मा, शासकीय कॉन्ट्रॅक्टर राजेश मुंदडा, राजीक पठाण, पत्रकार राजेश सराफी, योगेश आसोले, पंकज वानखडे यांच्यासह नगरपरिषद प्रशासनातील पाणीपुरवठा अभियंता आशिष कुराळकर, बांधकाम अभियंता कीर्ती जावडेकर, लिपिक जितेंद्र करसे, बंडू वानखडे, मनीष कनोजे तसेच नगरपरिषदेचे अधिकारी-कर्मचारी आणि असंख्य नागरिक उपस्थित होते.

कॅन्सरग्रस्त शुभम बारई यांना ११ हजारांची मदत

सप्तरंग गणेशोत्सव मंडळाचा सामाजिक उपक्रम

आमा प्रतिनिधी/२७ सप्टेंबर

नांदगाव पेठ : गणेशोत्सव म्हणजे केवळ जल्लोष आणि मनोरंजन नव्हे, तर सामाजिक बांधिलकी जपण्याची संधीही आहे, हे नांदगाव पेठ येथील सप्तरंग क्रीडा मंडळाने आपल्या कृतीतून दाखवून दिले. गणेश विसर्जनाच्या पूर्वसंध्येला मंडळाच्या वतीने कॅन्सरशी झुंज देत असलेल्या शुभम बारई यांना उपचारासाठी ११ हजार रुपयांची सहकार्य राशी देऊन मदतीचा हात पुढे करण्यात आला.

उत्सवाच्या खर्चाला केवळ दिखाव्यापुरते मर्यादित न ठेवता गरजू रुग्णाच्या उपचारासाठी मदतीचा हात देण्याचा मंडळाचा हा उपक्रम सामाजिक बांधिलकीचे उदाहरण ठरला आहे. शुभम बारई यांच्या उपचारासाठी आर्थिक मदतीची गरज लक्षात घेऊन मंडळाने पुढाकार घेत ही मदत केली. गणरायाच्या उत्सवातून माणुसकीची सेवा आणि सामाजिक संवेदनशीलतेचा संदेश देणाऱ्या या उपक्रमाचे नांदगाव पेठ परिसरातून कौतुक होत आहे. गणेशोत्सवाच्या आनंदासोबतच एका गरजू कुटुंबाला आधार देण्याचा प्रयत्न मंडळाने केला.

यावेळी सप्तरंग क्रीडा व शिक्षण संस्थेचे अध्यक्ष राजेंद्र तुळे, दीप बंड, जयेश खंडारे, देवेश नागापुरे, रोशन तुळे, मयूर मुळे, सनी खडसे, हिमांशू साखरकर, आदित्य मोहोड, आदित्य राऊत, नमन कळंबे, नमन मुळे, प्रथमेश गोटे, प्रतीक सरदार यांच्यासह मंडळाचे पदाधिकारी, कार्यकर्ते व सभासद मोठ्या संख्येने उपस्थित होते.

कृष्णाबाई दंडाळे कन्या विद्यालयाची कबड्डी चमू जिल्हास्तरावर उपविजयी

आमा प्रतिनिधी/२७ सप्टेंबर

तिवसा : स्थानिक कृष्णाबाई दंडाळे कन्या विद्यालय व उच्च माध्यमिक विद्यालय तिवसा च्या १९ वर्ष आतील मुलींच्या कबड्डी चमूने उपविजेते पद प्राप्त केले आहे. नुकत्याच मोर्शी येथे पार पडलेल्या जिल्हास्तरीय कबड्डी स्पर्धेमध्ये उच्च माध्यमिक विद्यालयाच्या मुलींच्या चमुने आपल्या कौशल्याचे शानदार प्रदर्शन करत उपविजेते पद प्राप्त केले आहे. केवळ अभ्यासामध्येच नाही तर क्रीडा क्षेत्रामध्ये देखील शाळेने आपला ठसा उमटवला आहे. तीवसा येथे पार पडलेल्या तालुकास्तरीय कबड्डी स्पर्धेमध्ये विजयी होऊन ही चमू जिल्हास्तरासाठी पात्र झाली होती. विजयी चमुच्या या यशाबद्दल संस्थेचे अध्यक्ष गंगाधरराव दंडाळे, सचिव विद्याधरराव दंडाळे, संस्थेच्या सदस्या छायाताई दंडाळे, शाळेच्या मुख्याध्यापिका कु.जे.ई. सोनारे मॅडम, सदस्य विलास भाऊ इंगोले, प्रा. सुनील बुरघाटे, पर्यवेक्षक प्रवीण हरणे प्रा. मिनल पडोळे यांनी विद्यार्थिनींच्या या यशाबद्दल त्यांचे अभिनंदन केले आहे.

ॲड.अरुण गावंडे यांना मातृशोक

आमा प्रतिनिधी/२७ सप्टेंबर

अमरावती : शहरातील कॉंग्रेस नगर निवासी प्रसिद्ध विधिज्ञ अरुणराव गावंडे यांच्या मातृश्री तसेच ॲड. निलेश गावंडे यांच्या आजी श्रीमती गं.भा. नर्मदाबाई विठ्ठलरावजी गावंडे यांचे शनिवार, २६ सप्टेंबर २०२६ रोजी रात्री ३.३० वाजता वृद्धापकाळाने निधन झाले. त्यांच्या पश्चात मुलगा ॲड. अरुण गावंडे,

पाहिजे

श्री विश्व गोविंद आयुर्वेद क्लिनिक, टोपे नगर, अमरावती येथे अनुभवी महिला पंचकर्म थेरपीस्ट हमी.

मसाज अनुभव आवश्यक.

डयुटी वेळ : १२ ते ८

आकर्षक पगार.

संपर्क : 7798517779

चौकीदार पाहिजे

बांधकाम साईट व लेआऊटवर २४ तास राहण्याकरिता व काम करण्याकरिता चौकीदार पाहिजे.

- संपर्क -

9371131694

SARASWATI BAHUUDDESHIYA SHIKSHAN SANSTHA, AMRAVATI

SARASWATI INSTITUTE OF NURSING SCIENCES & RESEARCH

(Affiliated to MUHS, Nashik | Recognized by Indian Nursing Council & Maharashtra Nursing Council)

Email: saraswatiinstitutensg11@gmail.com

Website: www.sinsramt.org

अश्विनी वितोंडे महाराष्ट्र महिला प्रदेश कार्याध्यक्ष पदी

आमा प्रतिनिधी/२७ सप्टेंबर

तिवसा : आगामी स्थानिक

चाहत्यांकडून

आला. पक्षनेतृत्वाने माझ्यावर दाखवलेला विश्वास सार्थ

महत्त्वपूर्ण नियुक्ती केली असून अमरावती जिल्ह्यातील तिवसा तालुक्यातील मोझरी येथील सामाजिक कार्यकर्त्या अश्विनी वितोंडे यांची पक्षाच्या महाराष्ट्र महिला प्रदेश कार्याध्यक्षपदी नियुक्ति करण्यात आली. काँनराड संगमा यांच्या अध्यक्षतेखाली मुंबई येथे झालेल्या विशेष बैठकीत महाराष्ट्र प्रदेशाध्यक्ष अमितदादा वेळुकर पाटील यांच्या उपस्थितीत अश्विनी वितोंडे यांच्या नियुक्तीवर शिक्कामोर्तब करण्यात संघटन मजबूत करणे आणि गावपातळीपासून राज्यपातळीपर्यंत पक्षाची संघटनात्मक बांधणी करण्याला आपले प्राधान्य राहणार असल्याचे यावेळी अश्विनी वितोंडे यांनी सांगितले. यावेळी तिवसा येथील अक्षर मानव संघटनेच्या कार्यालयात ता २२ सप्टेंबर रोजी आयोजित कार्यक्रमात महाराष्ट्र प्रदेश कार्यकारी अध्यक्ष अमितदादा वेळुकर पाटील आणि राज्य पदाधिकाऱ्यांच्या उपस्थितीत अश्विनी वितोंडे यांना नियुक्तीपत्र प्रदान करण्यात आले.

यावेळी प्रमोद झाळे, अमर हरले, निलेश गाडेकर, योगेश सूर्यवंशी, याच्यासह उपस्थित मान्यवरांनी अश्विनी वितोंडे यांचे अभिनंदन करून पुढील कार्यासाठी शुभेच्छा दिल्या.

बॅ.राजाभाऊ खोब्रागडे बाबासाहेबांच्या चळवळीचे प्रामाणिक नेते

प्रा.अशोक गोडघाटे यांचे प्रतिपादन

आमा प्रतिनिधी/२७ सप्टेंबर

अमरावती : विश्वरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर याच्या महापरिनिर्वाणानंतर खऱ्या अर्थाने बाबासाहेबांच्या चळवळीचा रथ पुढे नेणारे एकमेव प्रामाणिक व कर्तुत्ववान नेते बॅरिस्टर राजाभाऊ खोब्रागडे होते. डॉक्टर बाबासाहेब आंबेडकरांनी त्यांच्या जो विश्वास टाकला होता त्या विश्वासाला त्यांनी शेवटच्या श्वासापर्यंत तडा जाऊ दिला नाही असे प्रतिपादन नागपूर येथील ज्येष्ठ आंबेडकरी विचारवंत प्रा अशोक गोटघाटे यांनी केले.

बॅरिस्टर राजाभाऊ खोब्रागडे समारोह समिती व बॅरिस्टर राजाभाऊ खोब्रागडे मेमोरियल ट्रस्ट यांच्या संयुक्त विद्यमाने बॅरिस्टर राजाभाऊ खोब्रागडे यांच्या १०१ व्या जयंतीनिमित्त विशेष व्याख्यानाचे आयोजन संबोधी: डॉ. बाबासाहेब आंबेडकर संस्कार भवन भीम टेकडी येथे शुक्रवार(ता. २५) रोजी करण्यात आले होते.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी माझी प्राचार्य डॉक्टर गोपीचंद मेश्राम होते तर प्रमुख उपस्थिती म्हणून संयुक्त रिपब्लिकन आघाडीचे आघाडीचे अध्यक्ष डॉ. पी एस खडसे, स्वागत अध्यक्ष म्हणून समाजभूषण उत्तमराव गवई,सयोजक प्रा.अशांत रंगारी,नयन मोंढे, सत्कारमूर्ती वसंतराव गवई, कमलताई कांबळे धम्मपिठावरील विराजमान होते.

जयंती उत्साहात मान्यवरांचे अभिवादन

अशोक गोडघाटे पुढे म्हणाले की, बॅरिस्टर राजाभाऊ खोब्रागडे यांच्या नेतृत्वात शेड्युल का फेडरेशन ला १९५७ च्या निवडणुकीमध्ये भरगोस यश मिळाले महाराष्ट्रातून सहा गुजरात मैसूर व मद्रास मधून प्रत्येकी एक खासदार निवडून आला. महाराष्ट्र विधानसभेत १७ आमदार पंजाब मधून पाच आमदार कर्नाटक दोन आंध्र प्रदेश एक गुजरात दोन मद्रास दोन असे तब्बल २९ आमदार बॅरिस्टर राजाभाऊंच्या नेतृत्वात देशभरातून निवडून आले होते कनिष्ठ राजाभाऊ खोब्रागडे १९५८ चे १९८४ या कालावधीत राज्यसभेचे सदस्य होते १९६९ मध्ये हे राज्यसभेचे उपसभापती झाले रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया राज्यसभेत उपसभापती होण्याचा बहुमान मिळाला होता बुद्धांच्या सवलती, भूमिनांचा सत्याग्रह या आंदोलनासह अन्य आंदोलनाला ऐतिहासिक महत्त्व असल्याचे सांगितले.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक उत्तमराव गवई यांनी केले. संचालन प्रा जगदीश गोवर्धन तर आभार प्रा अशांत रंगारी यांनी मानले. कार्यक्रमाला यशस्वी करण्याकरिता रमेश रामटेके, रविकांत गवई, प्रा.डा प्रेमानंद तिडके, चरणदास इंगोले, राजुजी नन्नवरे, डॉ. वसंत शेंडे, किशोर बोरकर,नारायण थोरात, भारत शहारे, सुदाम सोनुले, रमेश कटके, डॉ. कमल राऊत, माजी सभापती प्रकाश बनसोड, नगरसेवक सचिन वैद्य, सुरेश तायडे, उमेश सहारे, एडवोकेट सुनील गजभिये, चरणदास नंदागवळी, भगवान गजभिये, रामेश्वर रामटेके, एडवोकेट दिलीप घरडे, ओमप्रकाश बनसोड यांच्यासह डॉ. बाबासाहेब आंबेडकर संबोधी स्टडी सर्कल, डॉ. बाबासाहेब आंबेडकर महिला प्रबोधिनी, लॉर्ड बुद्धा इंटरनॅशनल ट्रस्ट, बौद्ध धम्म प्रचार समिती, बौद्ध उपासक संघ, साची फाउंडेशन, भारतीय बौद्ध महासभा, पिरिपा, खोरिपा, वंचित बहुजन आघाडी, एकता रॅली आयोजन समिती, तथागत टीव्ही रिपाई गवई गट यांच्यासह विविध सामाजिक संघटना च्या पदाधिकारी कार्यकर्त्यांनी सहकार्य केले.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या चळवळीत योगदान असणाऱ्या आंबेडकरी चळवळीतील ज्येष्ठ कार्यकर्त्यांचा यावेळी उपस्थित मान्यवरांच्या हस्ते शाल पुष्पगुच्छ देऊन जाहीर सत्कार करण्यात आला त्यामध्ये डॉक्टर एम पी थोरात रेजनीताई खोब्रागडे पुंजारामजी ठवरे गुरजी, दादासाहेब शिरसागर, वसंतराव गवई, कमलताई कांबळे,प्रा. भाऊ ढंगारे, सुमंनताई अंभोरे, एडवोकेट एल बी मेश्राम, विठ्ठलराव गजभिये, प्रभाकर घोडेस्वार यांचा सत्कार करण्यात आला.

दैनिक आपली मातृभूमि हे पत्र प्रकाशक, मुद्रक अनिल जुगलकिशोर अग्रवाल यांनी प्रणय कम्युनिकेशन, मच्छीसाथ, सातखिराडी रोड, अमरावती येथे मुद्रित करून दैनिक आपली मातृभूमि कार्यालय, खापर्डे बगीचा, अमरावती येथे प्रसिध्द केले.
संपादक : अनिल जुगलकिशोर अग्रवाल,
आरएनआय क्र. : MAHMAR/2010/34861
कार्यालय (फोन-०७२१) २५५०८५०, २६६६६००
Email:aplimatrubhumi@gmail.com वर्ष-१७, अंक-१३

दिनांक २७ सप्टेंबर २०२६ रोजी दुपारी १:०० वाजता शिवणी रसुलापूर (ता.नांदगाव खंडेश्वर, जि.अमरावती) येथील राहत्या घरावरून निघेल. त्यानंतर स्थानिक हिंदु स्मशानभूमीत त्यांच्यावर अंत्यसंस्कार करण्यात येतील. मृत आत्म्यास विनम्र श्रद्धांजली.

जाहिरात छोटी प्रतिसाद मोठा
आपली मातृभूमि
क्लासिफाईड/ जाहीरनामा
देण्या करीता संपर्क
7028006660

सेल्समन पाहिजे
वरुड शहरात टाईल्स शोरूम करीता सेल्समन पाहिजे अनुभवी व्यक्तीला प्राधान्य.
मोबा.९४२२१५५३४६

रेडी पझेशन बँगलो
रेडी पझेशन, मुख्य रोड टच, साईनगर
3 BHK अल्ट्रा प्रिमीयम बंगलोज
६८.५० ला-पासुन
दिशा : उत्तर पूर्व / उत्तर;
बांधकाम १५५०.फूट
पत्ता :- मूक बधिर विद्यालय रोड, यशवंत लॉन पुढे
फोन: 8275590119/ 9977053960/9130213466
सुख सुरज इन्फ्रा प्रस्तुत

Change in Name
(Old Name)
Praful Baliramji Dakare
(New Name)
Praful Baliram Dakare
- Address -
At.Po.Shendurjana Ghat, Tq.Warud, Dist.Amravati -444908

Change in Name
(OLD NAME)
SHAIKH ATHAR SHAIKH AYYUB
(NEW NAME)
SHAIKH ATHAR SHAIKH AYYUB ATAR
- Address -
NAVSARI, ANWAR MASJID, GULSHAN COLONY, V.M.V, AMRAVATI-444604, MAHARASHTRA

RECRUITMENT NOTICE

Applications are invited from eligible, qualified, and experienced candidates for the following non-teaching administrative post at Saraswati Institute of Nursing Sciences & Research, Amravati.

SR. NO	POSITION NAME	NO. OF POSTS	QUALIFICATIONS & EXPERIENCE REQUIREMENTS
1	Senior Accountant	01	• **Educational Qualification:** B.Com/M.Com • **Technical Skills:** Proficient in Tally ERP / Tally Prime • **Experience: Minimum 5 years of relevant** experience as a Senior Accountant in a recognized organization or institution.

APPLICATION GUIDELINES & HOW TO APPLY

- Interested and eligible candidates should forward their updated Resume / CV along with self-attested copies of educational qualifications and experience certificates.
- Applications must be sent via email to : saraswatiinstitutensg11@gmail.com
- Please mention "Application for the post of Senior Accountant" in the subject line of the email.
- Only shortlisted candidates will be called for the interview.

President / Secretary
Saraswati Institute of Nursing Sciences & Research, Amravati

Saraswati Bahuudeshiya Shikhsan, Sanstha, Badnera Road, Amravati Reg.No MH/639/08F/16068/AMT
Contact No. 8007851484/9823275329

SARASWATI INSTITUTE OF NURSING SCIENCES & RESEARCH, AMRAVATI
(Recognized to Govt. MNC & MUHS Nashik)

ADMISSION NOTICE

M.Sc NURSING (2 YEAR COURSE) – ACADAMIC YEAR 2026-2027
SPECIALITY WISE SEAT DISTRIBUTION

Speciality	Constitutional Reservation Category												
	SC	ST	VJ	NT-1	NT-2	NT-3	OBC	SBC	SEBC	EWS	OPEN	15% Inst	Total
Medical Surgical Nursing (CVTS)	1	0	0	0	0	0	1	0	1	1	4	2	10
Mental Health Nursing	0	1	0	0	1	0	0	1	1	1	4	1	10
Total	1	1	0	0	1	0	1	1	2	2	8	3	20

SR NO	SCHEDULE-1	DATE
1	Last date of submission of application form & specialty-wise preference form	03/10/2026
2	Publication of Provisional Selection List/ Merit List/ Waiting List/Rejected List (Specialty-wise)	05/10/2026
3	Last date of joining	09/10/2026

• IMPORTANT INSTRUCTION & GUIDELINES

1. Contact nos.: +91 80078 51484/+91 98232 75329
2. Selection of candidates will be purely on a merit basis and will strictly adhere to the reservation norms of the Government of Maharashtra, MUHS Nashik, and MNC
3. Please visit our website for the Application Form, Specialty-wise Preference Form, Merit List, Waiting List, Rejected List, Selection List, and other important information.
4. Incomplete applications or forms received after the due date will not be accepted.
5. All candidates must bring their original documents on the date of admission.
6. Application Will Be Accepted Even on Holiday, in person along with essential documents.
7. Note if any change in Cut off date Extension Schedule will be Display at www.sinsramt.org
8. Subsequent rounds will be conducted as per vacancy position and it will be notified on the institute website and notice board.

• **Note: Please keep checking the website regularly for the latest updates: www.sinsramt.org**

HOD, ADMISSION CELL — PRINCIPAL